# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती
## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक १२ ]

**दिनांक : २/१/२०१७** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

------------------------------------------------------------------------------------ ----------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी २०१७ ची मासिक सभा सोमवार दिनांक २/१/२०१७ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. पांढरकर निलेश शंकरराव | सभापती |
| 2. | मा. पात्रे राम संभाजी | सदस्य |
| 3. | मा. सुभद्रा ईश्वर ठोंबरे | सदस्या |
| 4. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 5. | मा. नंदा ताकवणे | सदस्या |
| 6. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्या |
| 7. | मा. सुजाता अविनाश टेकवडे | सदस्या |
| 8. | मा. काळभोर वैशाली जालिंदर | सदस्या |
| 9. | मा. गिरीष कुटे | स्वीकृत सदस्य |

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे - मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री सतिश इंगळे – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य , श्री विशाल कांबळे , मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा , श्रीम.रेखा गाडेकर – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्रीम एल.एस.बाबर - उपअभियंता, विदयुत, श्री संजय काशीद – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्रीम मोमीन झेड.आय. पाणीपुरवठा, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री पी.जे. कदम- लेखाधिकारी, श्री सोनकुसरे अरुण – अति. पथक प्रमुख, श्री पिंगळे आर एन - एपीआय निगडी वाहतुक इ. उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

त्यानंतर मागील सभेचा सभावृत्तांत [ दि. १७/१२/२०१६ कार्यपत्रिका क्रमांक १० ] वाचून कायम करणेत आला. मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक ७** : मा. क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील दि. **२/१/२०१७** रोजीचा प्रस्ताव

केंद्र शासनाने घोषित केलेनुसार स्वच्छ भारत मिशन **[** नागरी **]** अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्रमांक ८,१४,१६,१९ व २६ हगणदारी

मुक्त् जाहीर करणेस मा. प्रभाग समितीने दि. ३०/११/२०१६ रोजीच्या मासिक सभेत मान्य केलेले ठराव अंतिम / कायम करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ८ :-सन्मा.सदस्य शरद उर्फ राजू मिसाळ यांचा दि २/१/२०१७ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक **17** सेक्टर नंबर **27** प्राधिकरण स्टाफ कॉलनी कडील रस्त्याला **कै. अशोक भगवान शाळु** तसेच सेक्टर नंबर **27** मधील स्टाफ कॉलनी भागातील **चौकाला देवी अष्टभूजा चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ९ :- सन्मा.सदस्य शरद उर्फ राजू मिसाळ यांचा दि २/१/२०१७ चा प्रस्ताव**

प्रभाग क्रमांक **17** सेक्टर नंबर **28** मधील साई भुषण बेकरी व के अँड क्रिम जवळील चौकास **कै. रामदास किसन चौधरी चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक १० :-** सन्मा. सदस्य **आर. एस. कुमार, सदस्या मा. भारती फरांदे** यांचेकडील पत्र दि. २/१/२०१७

प्रभाग क्रमांक **१४ सेक्टर नंबर २६ मधील समर्थ रिक्षा स्टँडजवळील चौकास कै. बालमोहन रामकृष्ण घोरपडे चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

वरील प्रमाणे ऐनवेळ**चे** विषय सभा कामकाजात दाखल करणेत आले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक ९१ | विषय क्रमांक १ |
| दिनांक : **२/१/२०१७** | विभाग : |
| सुचक :-मा. सुभद्रा ठोंबरे | अनुमोदक : मा. शारदा बाबर |

संदर्भ :- सन्मा. सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचेकडील पत्र दि. **31/12/2016**

प्रभाग क्रमांक १० अजंठानगर येथील बीसी पत्राशेडची लोकसंख्या विचारात घेता तेथे असलेल्या स्वच्छतागृहामध्ये असलेले संडास ब्लॉक अपुरे पडत आहेत. त्यामुळे महिला, आबालवृध्द व तेथील लोकांची गैरसोय होत आहे. भारत स्वच्छता अभियानाअंतर्गत प्रत्येक कुटूंबाला स्वच्छतागृह बांधून मिळत आहे. परंतु अंजठानगरमध्ये जागा उपलब्ध नाही. म्हणून सध्याचे संडास पाडून आरसीसीमध्ये दोन मजली संडासची इमारत बांधून त्यावर पाण्याची टाकी बसविणेस **व** या स्वच्छतागृहात पुरुषासाठी असलेल्या संडासच्या बाजूला मुतारीची देखील वेगळी व्यवस्था करणेस व स्वच्छतागृहामध्ये सुरक्षित जाळीचे आवरण असलेल्या लाईट बसविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक ९२ | विषय क्रमांक २ |
| दिनांक : **२/१/२०१७** | विभाग : |
| सुचक :-मा. सुभद्रा ठोंबरे | अनुमोदक : मा. शारदा बाबर |

संदर्भ :- सन्मा. सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचेकडील पत्र दि. **31/12/2016**

सम्राट अशोक प्रेम, सहिष्णूता, सत्य, अहिंसा एवं शाकाहारी जीवनप्रणालीचे कट्टर समर्थक होते त्यामुळे त्यांचे नाव इतिहासात महान परोपकारी सम्राटाच्या रुपांत अढळ स्थान आहे. त्यांनी गौतम बुध्दाच्या विचार प्रणालीचा प्रसार केला. तसेच भारतात नव्हे तर

परदेशात श्रीलंका, अफगाणिस्तान, पश्चिम एशिया, मिश्र तसेच यूनान येथे बुध्द धर्माचा प्रसार केला आहे.

सम्राट अशोक राजाचे कार्य खूप महान आहे. त्यांचे कार्य सर्वसामान्यांच्या लक्षात येण्यासाठी व त्यांच्या सन्मार्गावर जाण्यासाठी तसेच त्यांची प्रेरणा नागरिकांना मिळण्यासाठी अजंठानगर येथील माता रमाबाई आंबेडकर शाळेच्या कॉर्नरच्या चौकाला **सम्राट अशोक चौक** असे नामकरण मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

ठराव क्रमांक ९३ | विषय क्रमांक ३

दिनांक : **२/१/२०१७** | विभाग :

सुचक :-मा. सुभद्रा ठोंबरे | अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ :- सन्मा. सदस्या सुभद्रा ठोंबरे यांचेकडील पत्र दि. **31/12/2016**

प्रभाग क्रमांक १० अजंठानगर येथे आबालवृध्दांसाठी उदयान व विरंगुळा **कें**द्र किंवा मुला-मुलींसाठी अभ्यासासाठी उदयान नाही. त्यामुळे वरील पैकी कोणत्याही प्रकारच्या सुविधा **अजंठानगर या** प्रभागामध्ये नसल्यामळे लोकांची गैरसोय होत आहे. व पिंपरी चिंचवड मनपापासून मिळणा-या या सुख सुविधापासून ते वंचित आहेत.

तरी अजंठानगर येथे आबालवृध्द तसेच मुलां-मुलींसाठी जनसामान्यांना वरदान ठरेल अशी सुसज्ज उदयान, आबालवृध्दांसा**ठी** सकाळी चालण्यासाठी वॉकींग ट्रॅक बनविणेस व बहुउद्देशीय पाच मजली बिल्डींग बांधून त्यामध्ये पुढील रचना करुन सुविधा पुरविणेस १. तळमजला आरोग्य केंद्र [मंजुर झालेले **आहे** ] २. सार्वजनिक वाचनालय पुस्तके डॉ. बाबासाहेब आंबेडकर विविध नेत्यांची चारित्र्य व कार्याची माहिती चांगल्या लेखकाची पुस्तके ३. मुला-मुलींना अभ्यासास चालना मिळावी म्हणून स्वतंत्र व अदयावत स्टडी रुम ४. मुलांसाठी जिम व व्यायामाचे साहित्य ५. पाचवा मजला विविध सामजिक कार्यासाठी सभा, जयंत्या, गरीबांच्या **लग्न्** , **साखरपूडा** कार्यासाठी प्रशस्त् हॉल अशी बिल्डींग **[या** उपसुचनेसह**]** उभी करण्यास जेणेकरुन अशी बिल्डींग जनसामान्यांना वरदान ठरेल व लोकांना सुखसोयी उपलब्ध होतील. तसेच संबंधित बिल्डींगला लिफ्ट व अदयावत सुविधा देणेस व त्याकामी येणा-या खर्चास **तसेच सदर उदयानास व बहुउद्देशीय इमारतीस मा. नगरसेवक ईश्वरजी ठोंबरे यांचे नाव देण्यास** मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

ठराव क्रमांक ९४ | विषय क्रमांक ४

दिनांक : **२/१/२०१७** | विभाग :

सुचक :-मा. राजू मिसाळ | अनुमोदक : मा. नंदा ताकवणे

संदर्भ :- सन्मा. सदस्य  राजू मिसाळ यांचेकडील पत्र दि. **31/12/2016**

प्रभाग क्रमांक १७ संत तुकाराम उदयान सेक्टर नंबर २७ मधील कृष्णा हौसिंग सोसायटी येथील रायगड बिल्डींग समोरील चौकास **शिवतीर्थ चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

**-----**

ठराव क्रमांक  ९५ — विषय क्रमांक ५

दिनांक : **२/१/२०१७** — विभाग :

सुचक :-मा. नंदा ताकवणे — अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ :- सन्मा. सदसया नंदा ताकवणे यांचेकडील पत्र दि. **31/12/2016**

प्रभाग क्रमांक १७ संत तुकाराम उदयान प्राधिकरण भागातील सी–यामिक वर्ल्ड या एजन्सीने प्राधिकरणातील आय.सी.आय.सी.आय.बँक समोरील चौक सुशोभिकरण  करण्या **बाब**त प्रस्ताव पाठविला आहे. तरी त्यांचा प्रस्ताव मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

**-----**

ठराव क्रमांक  ९६ — विषय क्रमांक ६

दिनांक : **२/१/२०१७** — विभाग :

सुचक :-मा. बाळासाहेब तरस — अनुमोदक : मा. सुमनताई नेटके

संदर्भ :- सन्मा. सदस्य  बाळासाहेब तरस यांचेकडील पत्र दि. **31/12/2016**

प्रभाग क्रमांक १८ किवळे येथील दत्तनगर भागातील **श्री दत्त मंदिर सरपंच वस्ती किवळे**  तसेच किवळे गावातील **श्री बापदेव महाराज मंदिर  किवळेगाव** असे नामफलक लावणेस  मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

**-----**

ठराव क्रमांक  ९७ — विषय क्रमांक ७

दिनांक : **२/१/२०१७** — विभाग : आरोग्य

सुचक :-मा. **राम पात्रे** — अनुमोदक : मा. वैशाली काळभोर

संदर्भ :- क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय  यांचेकडील  दि. २/१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

केंद्र शासनाने घोषित केलेनुसार स्वच्छ भारत मिशन [नागरी] अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्रमांक ८,१४,१६,१९ व २६ हगणदारी मुक्त जाहीर करणेस मा. प्रभाग समितीने दि. ३०/११/२०१६ रोजीच्या मासिक सभेत मान्यता  दिली आहे. याबाबत स्थानिक वृत्तपत्रात ( दै. संध्यानंद, दै. राष्ट्रतेज, दै. लोकप्रेरणा, दै. नविन संध्या., सा.नव्या समाजाची चाहूल ) जाहिर प्रकटन प्रसिध्द करुन दि. १९/१२/२०१६ पर्यंत सदर भागातील नागरिकांच्या सुचना/हरकती मागविणेत आल्या

होत्या. सदर कालावधीत कोणत्याही सुचना / हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. यास्तव प्रभाग क्रमांक ८,१४,१६,१९ व २६ हगणदारी मुक्त जाहीर करणेबाबत दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा. प्रभाग समितीने पारित केलेला ठराव अंतिम / कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

ठराव क्रमांक ९८ विषय क्रमांक ८

दिनांक : **२/१/२०१७** विभाग :

सुचक :-मा. **राजू मिसाळ** अनुमोदक : मा. **नंदा ताकवणे**

संदर्भ :- सन्मा. सदस्य **राजू मिसाळ** यांचेकडील पत्र दि. **2/1/2017**

प्रभाग क्रमांक **17** सेक्टर नंबर 27 **मधील** प्राधिकरण स्टाफ कॉलनी कडील रस्त्याला **कै. अशोक भगवान शाळु** तसेच सेक्टर नंबर **27** मधील स्टाफ कॉलनी भागातील **चौकाला देवी अष्टभूजा चौक** असे नामकरण करणेस तसेच सदरचे काम प्रभागातील अथवा मुख्यालयाकडील चालू असलेल्या स्थापत्य् विषयक कामातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

ठराव क्रमांक ९९ विषय क्रमांक ९

दिनांक : **२/१/२०१७** विभाग :

सुचक :-मा. **राजू मिसाळ** अनुमोदक : मा. **नंदा ताकवणे**

संदर्भ :- सन्मा. सदस्य **राजू मिसाळ** यांचेकडील पत्र दि. **2/1/2017**

प्रभाग क्रमांक **17** सेक्टर नंबर 28 मधील साई भुषण बेकरी व के अँड क्रिम जवळील चौकास **कै. रामदास किसन चौधरी चौक** असे नामकरण नामकरण करणेस तसेच सदरचे काम प्रभागातील अथवा मुख्यालयाकडील चालू असलेल्या स्थापत्य विषयक कामातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

ठराव क्रमांक **१००** विषय क्रमांक **१०**

दिनांक : **२/१/२०१७** विभाग :

सुचक :-मा. **राजू मिसाळ** अनुमोदक : मा. **नंदा ताकवणे**

संदर्भ :- सन्मा. सदस्य **आर. एस. कुमार, सदस्या मा. भारती फरांदे** यांचेकडील पत्र दि. **2/1/2017**

प्रभाग क्रमांक **१४** सेक्टर नंबर २६ मधील समर्थ रिक्षा स्टँडजवळील चौकास **कै. बालमोहन रामकृष्ण घोरपडे चौक** असे नामकरण करणेस तसेच सदरचे काम प्रभागातील अथवा मुख्यालयाकडील चालू असलेल्या स्थापत्य विषयक कामातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला .

-----

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा. सभापती निलेश पांढरकर यांनी **वरील मंजुर ठरावांवर सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेच्या सुचना देऊन** प्रस्तुतची सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(निलेश शंकरराव पांढरकर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/२२/२०१७
दि. ६/१/२०१७

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - ४४

प्रति,
सर्व संबंधित विभाग